# जिल्हा समादेशक होमगार्ड ठाणे

दुरध्वाी क्रमांक:- 0251-2682085 Email Id - dchgthane@yahoo.com

जावक क्र.जिहोगा/प्रशा/2024/ १६७०
जिल्हा समादेशक होमगार्ड ठाणे यांचे कार्यालय,
नागरी संरक्षण दल, सिध्दार्थनगर, अंबरनाथ,
(पश्चिम) - जिल्हा ठाणे.
दिनांक - ३१/८/२०२४

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी,
ठाणे.

विषय :- होमगार्ड सदस्य नोंदणी कार्यक्रम वेळापत्रक बाबतची प्रेस नोट सत्वर प्रसिध्दीस देणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, ठाणे जिल्हा होमगार्ड तर्फे ठाणे जिल्हयातील पुरुष व महिला अनुशेष भरुन काढण्यासाठी नवीन होमगार्ड सदस्य नोंदणी करीता https://maharashtracdhg.gov.in/mahahg/login1.php या संकेत स्थळावर दि.१०/८/२०२४ ते दि.२५/८/२०२४ या कालावधीत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते.

तथापि ऑनलाईन अर्ज केलेल्या उमेदवारांना कागदपत्र पडताळणी व शारिरीक क्षमता चाचणी करीता दिनांक २३/९/२०२४ या कालावधीत दररोज सकाळी ०६.०० वाजता खालीलप्रमाणे नमुद केलेल्या दिनांकास पोलीस आयुक्त, पोलीस कवायत मैदान, साकेत ठाणे येथे बोलाविण्यात येत आहे. उमेदवारांना सकाळी ०५.०० ते १०.०० या कालावधीमध्ये मैदानात प्रवेश दिला जाईल.

| अ.क्र. | दिनांक | बोलाविण्यात आलेले अर्ज नोंदणी क्रमांक | उमेदवार संख्या |
|---|---|---|---|
| 1 | दि.23/9/2024 | ठाणे विभाग पुरुष उमेदवार (महिला वगळुन) अर्ज क्र.1 ते अर्ज क्र.2724 | 2000 |
| 2 | दि.24/9/2024 | ठाणे विभाग पुरुष उमेदवार (महिला वगळुन) अर्ज क्र.2725 ते 6010 | 2583 |
| | | पालघर विभाग पुरुष उमेदवार (महिला वगळुन) अर्ज क्र.1 ते 1367 | 1000 |
| 3 | दि.25/9/2024 | पालघर विभाग पुरुष उमेदवार (महिला वगळुन) अर्ज क्र.1368 ते 5834 | 3608 |
| 4 | दि.26/9/2024 | ठाणे जिल्हा सर्व महिला उमेदवार | 1427 |
| | | पालघर जिल्हा सर्व महिला उमेदवार | 1226 |

सदर नोंदणी ही फक्त ठाणे जिल्हयातील ठाणे विभाग व पालघर विभागातील वसई पथकाकरीता संबंधित पोलीस स्टेशनच्या हददीतील रहिवाशी उमेदवारांकरीता आहे. इतर ठाणे व पालघर जिल्हा व्यतिरिक्त इतर जिल्हयातील उमेदवारांनी नोंदणी कार्यक्रमाकरीता उपस्थित राह नये, त्यांना प्रवेश दिला जाणार नाही.

कागदपत्र पडताळणी व शारिरीक क्षमता चाचणीकरीता येताना ऑनलाईन अर्जासह आवश्यक मुळ कागदपत्रे व उमेदवारांनी स्वत: स्वाक्षरी केलेल्या छायांकित प्रती अर्जासोबत सोबत आणणे आवश्यक आहे. नोंदणीच्या दिवशी अर्ज स्वत:हा उमेदवारांनी घेऊन यावे. कागदपत्र पडताळणी वेळी अपात्र झाल्यास त्यांना पुढील कोणत्याही चाचणीकरीता प्रवेश दिला जाणार नाही.

तसेच NCC B व C प्रमाणपत्र, ITI (कमीत कमी ६ महिने कालावधी पुर्ण असलेले किंवा त्यापेक्षा जास्त), जिल्हास्तरीय क्रिडामध्ये (कमीत कमी प्रथम, व्दितीय व तृतीय श्रेणी आवश्यक ) व राज्यस्तरीय प्राविण्य प्राप्त, जडवाहन चालक परवाना धारक व इतर अन्य तपशिलाच्या पृष्ठार्थ सर्व संबंधित मुळ प्रमाणपत्र व नजीकच्या काळातील दोन पासपोर्ट साईज फोटो नोंदणीवेळी सादर करणे बंधनकारक असेल. उमेदवारास नोंदणीच्या ठिकाणी स्वखर्चाने यावे लागेल. तसेच नोंदणीच्या वेळी किंवा प्रवासात काही अपघाती घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जवाबदारी ही संबंधित उमेदवाराची राहिल.

उमेदवारांना शारिरीक क्षमता चाचणीमध्ये पात्र होणंकरीता प्रत्येक प्रकारामध्ये 40 टक्के गुण मिळविणे आवश्यक राहिल. धावणे व गोळाफेक मधील कोणत्याही पहिल्या चाचणीमध्ये 40 टक्के गुण न मिळाल्यास त्यांना पुढील चाचणी परिक्षा देता येणार नाही. (धावणे या प्रकारात किमान 10 गुण व गोळाफेक या प्रकारात किमान 04 गुण आवश्यक )

सदर होमगार्ड सदस्य नोंदणी प्रक्रिया अत्यंक पारदर्शक व इन कॅमेरा पार पाडण्यात येणार असुन होमगार्ड नोंदणी करीता उमेदवारांनी कोणत्याही आमिषाला बळी पडू नये. तसेच शिफारस / वशिला इ.गैरमार्गाचा वापर करु नये. होमगार्ड नोंदणी करीता कोणी पैसे / लाचेची मागणी केल्यास तात्काळ मा.अपर पोलिस अधिक्षक, ठाणे ग्रामीण व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांचेकडे तक्रार करावी.

अतिवृष्टीमुळे वेळापत्रकामध्ये बदल झाल्यास त्याची सुचना https://maharashtracdhg.gov.in/mahahg/login1.php या संकेत स्थळावर वेळोवळी देण्यात येईल, त्यामुळे उमेदवारांनी सदर संकेत स्थळावरील सुचना करीता अद्यावत रहावे.

सदरची प्रेस नोट आपलेमार्फत ठाणे जिल्हयातील स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द होणेस विनंती.

(राहुल झालटे )
जिल्हा समादेशक, होमगार्ड, ठाणे तथा
अपर पोलिस अधिक्षक, ठाणे ग्रामीण करिता

प्रत :- मा.महासमादेशक, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीकरीता सविनय सादर.